PUBLICATION – PUDHARI
DATE – APRIL 22, 2010
PAGE NO. –4(MY PUNE)

# कॉटनकिंग आता सुपर प्रीमिअम वेअर श्रेणीत



**पुणे** (प्रतिनिधी) : पुरुषांसाठीच्या रेडिमेड कॉटन कपड्यांच्या निर्मितीसाठी प्रसिद्ध असलेल्या कॉटनकिंगने नव्या कॉटनकिंग रोयाल या शर्ट मालिकेद्वारे सुपर प्रीमिअम कॉटन वेअर श्रेणीत पदार्पण केले आहे. कॉटनकिंग रोयाल मालिकेत सुरुवातीला आम्ही कॉटन आणि लिनन या दोन नैसर्गिक धाग्यांचे वापर असलेल्या वस्त्रापासून प्रीमिअम शर्टची निर्मिती करणार असून, एक वेगळाच सुखद अनुभव ग्राहकांना देण्याचा प्रयत्न करणार आहोत, असे कॉटनकिंग प्रा. लि. चे संपादक प्रदीप मराठे यांनी सांगितले. अतिनील किरणांपासून संरक्षण देण्याची क्षमता लिनन फायबरमध्ये असल्याने कॉटन व लिनन या दोन धाग्यांचा वापर केलेली ही 'कॉटनकिंग रोयाल' श्रेणी ग्राहकांना लुक, आराम आणि घातक किरणांपासून संरक्षण असा तिहेरी फायदा देणारी आहे. कॉटनकिंग रोयाल प्रीमियम मालिकेतील शर्ट ८९५ रुपयांस उपलब्ध असून, कॉटनकिंगच्या महाराष्ट्रातील सर्व २७ दालनांमध्ये २३ एप्रिलपासून उपलब्ध होणार आहे.